**MHWR080001292026**

इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०/२०२६
शासन वि. शोभा धनराज नारनवरे

## निशाणी क्र.१ वरील आदेश

सदरचा अर्ज हा अर्जदार श्रीमती शोभा धनराज नारनवरे हिने तिच्या मालकीचे चोरी गेलेले १) गळ्यातील सोन्याची पोत १० ग्रॅम, २) अष्टकोन मणी १० ग्रॅम, ३) मण्यात ओळलेली पोत २ ग्रॅम असे एकूण २२ ग्रॅम सोन्याचे दागिने परत मिळण्याकरिता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम ५०३ अन्वये अर्ज दाखल केला आहे. (यापुढे 'दागिने' संबोधण्यात येईल). सदर घटनेचा रिपोर्ट अर्जदाराने दिनांक २२/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन आर्वी येथे दिला असून, त्यावरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३०९(४) आणि एफआयआर क्र. ०९२४/२०२५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

२) अर्जदाराचे कथन असे की, अर्जदार ही बांगड्या विकून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असते. दिनांक २१/१०/२०२४ रोजी अर्जदार खुबगाव येथे बांगड्या विकण्याकरिता गेली असता, अज्ञात व्यक्तीने अर्जदाराच्या गळ्यातील सोन्याचे आभूषण जबरीने हिसकावून पळून गेला. सदर घटनेची तक्रार अर्जदाराने दिनांक २२/१०/२०२५ रोजी पोलीस स्टेशन आर्वी येथे दिला असून, त्यावरून **भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०९(४)** अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.

३) अर्जदाराचे दागीने चोरी गेलेल्या सोन्याच्या आभूषणांचे वर्णन व

किमतीचा तपशील: अर्जदाराने सदर दागिने 'सचिन वझरकर ज्वेलर्स, आर्वी' येथून सुमारे ४० वर्षांपूर्वी खरेदी केले होते. दागिन्यांचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:

| आभूषणांचे वर्णन | वजन (ग्रॅम) | त्यावेळचा भाव (अंदाजे) |
|---|---|---|
| गळ्यातील सोन्याची पोत | १० ग्रॅम | ३,०००/– रुपये |
| सोन्याचे अष्टकोन मणी | १० ग्रॅम | ५,०००/– रुपये |
| काळ्या मण्यात ओळलेली पोत | ०२ ग्रॅम | ६००/– रुपये |
| **एकूण** | **२२ ग्रॅम** | **८,६००/– रुपये** |

४) अर्जदाराच्या अर्जावर सहाय्यक सरकारी वकील व तपासी अधिकारी यांचे म्हणणे मागविण्यात आले. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.६ नुसार दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, गुन्हा रजिस्टर क्रमांक ०९२४/२०२५ च्या तपासादरम्यान आरोपीचा शोध घेऊन, आरोपीला अटक करण्यात आली होती व त्याच्याकडून १) १४ कॅरेट चे शुध्दता असलेले ९.०४० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड किंमत रु. ९०,४००/– २) १४ कॅरेटचे शुध्दता असलेले ९.०६० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड किंमत रु.९०६००/– असा मुद्देमाल जप्त केला व आज रोजी पोलिस स्टेशनमध्ये जमा आहे. पुढे त्यांच्या म्हणण्यानुसार वरील मालमत्तेबाबत फिर्यादी यांनी गुन्हा दाखल झाल्यापासुन सोन्याचे दागीने खरेदी केल्याबाबतची कोणतेही बिल किंवा पावती अद्यापर्यंत सादर केलेली नाही. सरकारी अभियोक्ता यांनी सुध्दा तपासी अधिकाऱ्याच्या कथनाला दुजोरा दिलेला आहे. सदर प्रकरणात योग्य तो आदेश पारीत करावा ही विनंती केली आहे.

५) तसेच बरीच संधी देउनदेखील आरोपीने त्याचे म्हणणे सदरील अर्जावर दिलेले नाही. त्यामुळे सदरील अर्जावर त्याचे म्हणणे दाखल केल्याशिवाय आदेश करण्यात येतो. तसेच अर्जदाराने कथनाच्या समर्थनार्थ आधार कार्ड व प्रथम खबर अहवाल हे दस्त अभिलेखावर दाखल केलेले आहे याव्यतिरिक्त इतर कोणतेही दस्त अभिलेखावर दाखल केलेले नाही.

६) वरील सर्व विवेचनाचा विचार करता असे दिसुन येते की, अर्जदार ही बांगड्या विक्रीसाठी खुबगांव येथे गेली असता एका अज्ञात व्यक्तीने तिचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून नेले, अशी तक्रार दिलेली आहे. अर्जदाराने आपल्या फिर्यादीत कोणत्याही विशिष्ट आरोपीचे नाव, ओळख किंवा इतर तपशील दिलेला नसून आरोपीचा उल्लेख फक्त "अज्ञात व्यक्ती" असा केलेला आहे. अशा परिस्थितीतही पोलिसांनी पुढील तपासात आरोपीचा शोध घेतल्याचे नमूद करून त्याच्याकडून काही सोन्याचा मुद्देमाल जप्त केल्याचे सांगितले आहे. अर्जदाराने आपल्या अर्जात ज्या दागिन्यांचा उल्लेख केला आहे, त्यामध्ये गळ्यातील सोन्याची पोत व अष्टकोनी मण्यांची पोत असा विशिष्ट तपशील दिलेला आहे. तसेच, हे दागिने सुमारे ४० वर्षांपूर्वी सचिन वझरकर ज्वेलर्स यांच्याकडून खरेदी केल्याचेही नमूद केले आहे. अर्जदाराला खरेदीचे ठिकाण माहिती असूनही तिने संबंधित सोन्याच्या खरेदीबाबत कोणतेही बिल, पावती किंवा अन्य दस्तऐवज अद्याप सादर केलेले नाही. त्यामुळे त्या दागिन्यांच्या मालकीबाबत शंका निर्माण होते. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये अर्जदाराने वर्णन केलेल्या दागिन्यांऐवजी "सोन्याची लगड" जप्त केल्याचे नमूद केले आहे. यामुळे अर्जदाराने सांगितलेले दागिने आणि प्रत्यक्ष जप्त मुद्देमाल यामध्ये स्पष्ट तफावत दिसून येते. वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता अर्जदाराच्या अर्जात, पोलिस तपासामध्ये

व जप्त मुद्देमालामध्ये तर्कसंगत सुसंगती आढळून येत नसून संबंधित दागिन्यांच्या मालकीबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे हे न्यायालय खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Digitally signed by MRUNAL GAJENDRA HINGANGHATE
Date: 2026.05.06 15:07:38 +0530

**(एम. जी. हिंगणघाटे)**

दिनांकः०६/०५/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.१), आर्वी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment / Order

Name of Steno: Atul C. Gote, Grade–III

Name of Court: J.M.F.C. Arvi

Date of Order: 06.05.2026